" लातूर जिल्ह्यातील विविध आर्थिक विकास स्तरांचा भौगोलिक अभ्यास "

मानव्यविद्या शाखेअंतर्गत, भूगोल विषयातील पीएच.डी.
(विद्या वाचस्पती) या पदवीकरीता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यास सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

पठाण दुलेखाँ इब्राहिम
(एम.ए., बी.एड्.)

मार्गदर्शक

डॉ. कोळपे संजीव हरि
सहयोगी प्राध्यापक (भूगोल विभाग)
(एम.ए., बी. एड्., एम. फिल., पीएच.डी.)
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड, ता. गंगाखेड, जि. परभणी.

भूगोल संशोधन केंद्र
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर.

ऑगस्ट - 2017

लातूर जिल्हा

LATUR
TEHSIL MAP
Parbhani
Bid
Nanded
Ahmadpur
Jalkot
Renapur
Chakur
Latur
Udgir
Shirur-Anantpal
Deoni
Ausa
Nilanga
Karnataka
Osmanabad
Legend
State Boundary
District Boundary
Tehsil Boundary
0 2.25 4.5 9 13.5 18
Miles
Copyright © 2015 www.mapsofindia.com
(Last Updated on 8th Sep 2015)
www.mapsofindia.com

लातूर जिल्ह्यातील विविध आर्थिक विकास स्तरांचा भौगोलिक अभ्यास

प्रास्ताविक:-

भारतातील एकूण लोकसंख्येच्या 68.84% लोकसंख्या आजही ग्रामीण भागामध्ये राहते. शेती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. म्हणूनच भारत हा देश कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्र राज्याचा विचार करता महराष्ट्रातील 82% शेती ही कोरडवाहू असून त्याची उत्पादकता अंत्यत नगण्य आहे. कृषीबरोबरच पशुपालन, कुकुटपालन, दुग्धव्यवसाय इ. शेतीला पुरक व्यवसाय केले जातात. महाराष्ट्रातील अशा कृषी विकासाबरोबरच तेथील मुलभूत सुखसोईचाही विकास होणे आवश्यक आहे. आज जागतीकिकरणाच्या आधुनिक युगात राज्याची व देशाची प्रगती या मुलभूत सुविधांवर अवलंबून असते. म्हणूनच देशामध्ये मुलभूत सुविधा प्राप्त करून देण्यासाठी केंद्रशासन व राज्यशासन प्रयत्नशिल असतात.

ग्रामीण महाराष्ट्रात शिक्षणाच्या अपुऱ्या सोई-सुविधांमुळे येथे साक्षरतेचेही प्रमाण कमी आढळते. पर्यायाने शासकिय व निमशासकिय नोकऱ्यामध्ये ग्रामीण लोकांचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे ग्रामीण भागात शिक्षण, शाळांची संख्या, महाविद्यालये, शेतीसाठी नियमीत विजपुरवठा, पाणीपुरवठा, रस्ते, वाहतूकीच्या सुविधा, आरोग्य इत्यादी मुलभूत घटकांची आवश्यकता आहे. या मुलभूत घटकांचा पाया मजबूत असेल तरच ग्रामीण भागामध्ये सामाजिक व आर्थिक विकास होत असतो. या ठिकाणी मुलभूत घटकांची उपलब्धताच महत्वाची नसते. तर त्यांच्या वितरणाचाही आर्थिक विकासावर परिणाम होत असतो. मुलभूत घटकांचे वितरण जर विषम प्रमाणामध्ये झाले असेल तर त्या ग्रामीण भागात आर्थिक विकासामध्ये प्रादेशिक असमतोल पहावयास मिळतो.

अभ्यास क्षेत्रः-

लातूर जिल्ह्यातील विविध आर्थिक विकास स्तरांचा भौगोलिक अभ्यास कोणत्याही भूगोल संशोधकाने केलेला नाही म्हणून "लातूर जिल्ह्यातील विविध आर्थिक विकास स्तरांचा भौगोलिक अभ्यास" (इ. सन. 2004-2005 ते 2014-2015) या विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे. महाराष्ट्रातील मराठवाड्यात 17^0 52' उत्तर अक्षवृत्त ते 18^0 50' उत्तर अक्षवृत्ता दरम्यान तर रेखावृत्तीय विस्तार 76^0 12' पूर्व रेखावृत्त ते 77^0 18' पूर्व रेखावृत्त दरम्यान लातूर जिल्ह्याचे स्थान असून लातूर जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ 7157 चौ. कि. मी. असून जनगणना 2011 च्या आकडेवारीनुसार लातूर जिल्ह्यामध्ये एकूण 10 तालुके आहेत. अभ्यास क्षेत्रामध्ये तालुकानिहाय लातूर तालुक्यात 122, रेणापूर तालुक्यात 79, अहमदपूर तालुक्यात 123, जळकोट तालुक्यात 47, चाकुर तालुक्यात 85, शिरूर अंनतपाळ तालुक्यात 48, औसा तालुक्यात 130, निलंगा तालुक्यात 162, देवणी तालुक्यात 54 आणि उदगीर तालुक्यात 98 अशी एकूण लातूर जिल्ह्यात 948 ग्रामीण वस्त्या आहेत.

अभ्यासाचे उद्देशः-

1. लातूर जिल्ह्यातील प्राकृतिक, सामाजिक व आर्थिक घटकांचा अभ्यास करणे.
2. लातूर जिल्ह्यातील लोकसंख्येचा अभ्यास करणे.
3. लातूर जिल्ह्यातील कृषी तंत्रज्ञानाचा अभ्यास करणे.
4. लातूर जिल्ह्यातील आर्थिक विकासाच्या निर्देशांकाचा अभ्यास करणे.
5. लातूर जिल्ह्यातील आर्थिक विकास स्तरांच्या केंद्रीयतेचा अभ्यास करणे.

गृहीतकेः-

1. आर्थिक विकासावर भौगोलिक घटकांचा प्रभाव आहे.
2. आर्थिक विकासावर मुलभूत सेवा-सुविधांचा (घटकांचा) परिणाम होतो.
3. सारक्षरतेचा आर्थिक विकासावर प्ररिणाम होतो.

अभ्यास पद्धती:-

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी वापरण्यात येणार असलेली आधार सामग्री प्राथमिक व दुय्यम स्वरूपातील असून प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी सर्वेक्षण, मुलाखत व प्रश्नावलीचा उपयोग करण्यात येणार आहे. विविध तालुक्यातील आर्थिक स्थितीचा अभ्यास तालुक्यातील निवडक गावांना भेटी देवून करण्यात येणार आहे. दुय्यम स्वरूपाची माहिती मिळविण्यासाठी लातूर जिल्ह्याचा जनगणना अहवाल, लातूर जिल्ह्याचे सामाजिक व आर्थिक समालोचन, कृषी अहवाल, विविध संशोधन पत्रिका, लातूर जिल्हा गॅझिटीअर, विविध संदर्भ ग्रंथ, नकाशे, गुगल अर्थ व वेगवेगळ्या माहितीपर संकेतस्थळांचा वापर करण्यात येणार आहे. त्याकरिता खालील सुत्राचा आधार घेण्यात येणार आहे.

$$\mathrm{r} = \frac{\sum dxdy}{\sqrt{(\sum dx)^2 \times (\sum dy)^2}}$$

आर्थिक विकासाचे केंद्रीकरण अभ्यासण्यासाठी Location quotient method या पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

$$C = \frac{t}{T} \times 100$$

खुलासा:

C = Score for any function 't'

t = One Unit of function 't'

T = Total Number function unints of 't' in the area.

V.L.S. Prakash Rao Method

$$D = \frac{T \times A}{U} \,/\, r = \frac{T \times A}{U}$$

Modified Method:

$$SI = \frac{TC \times A}{U} \; / \; R = \frac{\sqrt{TC \times A}}{U}$$

Jackson's Modified Method

$$Influence\ area\ according\ to\ area = \frac{Total\ Area}{Total\ No.of\ service\ centre}$$

$$Influence\ area\ according\ to\ villages = \frac{Total\ Villages}{Total\ No.of\ service\ centre}$$

$$Influence\ area\ according\ to\ population = \frac{Population}{Total\ No.of\ service\ centre}$$

याशिवाय विविध भूगोल अभ्यासकांच्या पद्धतीचा वापर करून आर्थिक विकासाचे स्तर अभ्यासण्यात येणार आहेत.

प्रकरण रचना:-

प्रकरण 1. प्रस्तावना

1.1 अभ्यास क्षेत्र व विषय निवड

1.2 अभ्यासाचे उद्देश

1.3 गृहीतके

1.4 अभ्यास पद्धती

1.5 यापूर्वी अशा प्रकारच्या झालेल्या संशोधनाचा आढावा

प्रकरण 2. लातूर जिल्ह्याची प्राकृतिक स्थिती

2.1 प्राकृतिक रचना

2.2 हवामान

2.3 मृदा

2.4 वनस्पती

प्रकरण 3. लातूर जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक स्थिती

3.1 भूमी उपयोग

3.2 कृषी

3.3 उद्योग

3.4 वाहतूक

3.5 लोकसंख्या

3.6 शिक्षण

प्रकरण 4. लातूर जिल्ह्यातील विविध तालुकानिहाय कृषी विकासातील फरक

4.1 जलसिंचन

4.2 विद्युत पुरवठा

4.3 आधुनिक बी-बियाणे

4.4 रासायनिक खते

4.5 उत्पादन

प्रकरण 5. लातूर जिल्ह्यातील विविध तालुकानिहाय आर्थिक विकासाच्या निर्देशांकातील फरक

5.1 शाळांची संख्या / महाविद्यालयांची संख्या

5.2 साक्षरतेचे प्रमाण

5.3 नोकऱ्यामध्ये असणाऱ्या लोकांची संख्या

5.4 रस्त्यांची लांबी

5.5 दुचाकी व चारचाकी वाहणांची संख्या

5.6 जलसिंचन

5.7 आधुनिक बी-बियाणांचा वापर

प्रकरण 6. क्षेत्र अभ्यास

6.1 प्रस्तावना

6.2 अभ्यास क्षेत्रातील प्राकृतिक विभाग

6.3 निवडक गावातील आर्थिक विकास स्तरांची तुलना

6.4 सारांश

प्रकरण 7. निष्कर्ष, समस्या व उपाययोजना

7.1 प्रस्तावना

7.2 निष्कर्ष

7.3 समस्या

7.4 उपाययोजना

संदर्भग्रंथ:-

1. लातूर जिल्ह्याचा जनगणना अहवाल - 2011
2. लातूर जिल्ह्याचे सामाजिक व आर्थिक समालोचन - 2014-15
3. कृषी अहवाल - 2013-14
4. लातूर जिल्हा गॅझिटीअर - 2014-15
5. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - 2012-13 वित्तिय सांख्यिकी विभाग
6. http://www.evivek.com/encyc/2014/11/10/ कृषीअधारीत-अर्थव्यवस्था -बळकटीकरणाची अव्हाने-व-उपाय.aspx
7. कुरुक्षेत्र: ग्रामीण विकासासाठी समर्पित - डिसेंबर 2012
8. डॉ. गोवर्धन खेडकर: महाराष्ट्रतील पायाभूत सुविधा-एक दृष्टिक्षेप, योजना मासिक, 2007
9. लोकराज्य: ग्रामोन्नती विशेषांक, एप्रिल-2012
10. पेडगावकर श्रीराम:मराठवाड्यातील पायाभूत सुविधांचा विकास - अर्थसंवाद-फेब्रुवारी 1997

संशोधक

पठाण दुलेखाँ इब्राहिम
मु. नागोबा नगर, अहमदपूर
ता. अहमदपूर जि. लातूर

मार्गदर्शक

डॉ. कोळपे संजीव हरि
सहयोगी प्राध्यापक (भूगोल विभाग)
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
गंगाखेड जि. परभणी.